# मागेल त्याला काम, कामाला दाम

## (महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना)

## (मार्गदर्शक पुस्तिका)



REEDS

Research in Environment, Education and Development Society

# श्रमशक्तीचे फळ











# मागेल त्याला काम, कामाला दाम

(महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना)
(मार्गदर्शक पुस्तिका)


अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रम, हितरक्षा केंद्र

REEDS

Research in Environment, Education and Development Society

# अनुक्रमणिका


१) रोजगार उपलब्धतेचा प्रश्न आणि त्यातून उद्भवणाऱ्या समस्या ........०५

२) पार्श्वभूमी आणि प्रवास........................................................०८

३) कार्यपद्धती ........................................................................१०

- मजूर नोंदणी .......................................................................१०
- जॉब कार्ड.............................................................................१०
- कामाचे नियोजन ...................................................................१०
- कोणकोणती कामे करता येतात .........................................०
- नियोजन आराखड्याचा प्रवास...........................................०
- वेळापत्रक ..............................................................................०
- कामाची मागणी ....................................................................१८
- काम न मिळाल्यास ................................................................१८
- काम मिळाल्यानंतर ..............................................................१८

४) तक्रार निवारण यंत्रणा.........................................................२१

५) काही महत्त्वाच्या व्यक्ती ......................................................२३

६) ऑनलाइन डेटा ......................................................................२५

७) महत्त्वाची कागदपत्रे..............................................................२८

ज्याला पोट नाही असा माणूस नाही आणि पोट भरायला हातांना काम हवं... आपल्या गावात राहून आपलं आणि आपल्या कुटुंबाचे पोट भरणे ही गोष्ट अवघड झाली तर आपल्या काही बांधवांना कामाच्या शोधात गाव सोडावे लागते... आपल्या गावात आपल्या कुटुंबासमवेत राहणे ही गोष्ट कोणाला नको वाटेल?

त्यासाठी शासनाची राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना काम करते. पण यासाठी कायद्याची योग्य माहिती आणि गावातील सर्वांची एकजूट आवश्यक आहे.

हे सगळ अवघड नाहियं, ते सगळे कसे करायचे हे आपण या पुस्तिकेतून समजून घेऊ या!

# १

# रोजगार उपलब्धतेचा प्रश्न आणि त्यातून उद्भवणाऱ्या समस्या

जगात आपल्या समाधानाची जागा म्हणजे आपलं घर आणि आपलं गाव! ज्या गावात आपलं शेत आहे, घर आहे, आपलं आयुष्य गेलं त्या गावात, आपण आनंदी आणि समाधानी राहू शकतो. आपल्या देशातील/राज्यातील अनेक बांधवांना रोजगार मिळवण्यासाठी, पोट भरण्यासाठी आपली गावं सोडून इतरत्र जावं लागतं. यालाच स्थलांतर म्हणतात. (स्थलांतर हे शहरातच होतं असं नाही.)


आपलं गाव आपल्याला रोजीरोटी देऊ शकत नाही असे आपल्याला वाटते आणि आपण शहराकडे जायचा विचार करतो. पण असे झाले तरी प्रश्न कमी असतात का?

या चित्रातून आपल्या लक्षात आले असेल की, गाव बदललं तरी प्रश्न सुटत नाही. परक्या गावी, सुरक्षित राहण्याच्या जागा मिळत नाहीत, कंत्राटदारांकडून शोषण होते, खर्च वाढतो, स्वच्छतेच्या अनेक समस्या असतात, स्थानिक प्रशासनाकडून त्रास दिला



जातो, रोजगाराला नेहमी उत्तम दर मिळतो असे नाही. आरोग्याच्या पुरेशा सुविधा नसतात. मोकळी हवा, पुरेसे पाणी आणि भक्कम घर हे शहरात मिळत नाही. आजारी पडण्याचे प्रमाण खूप असते. म्हणजे पैसा मिळतोही आणि जातोही... याबरोबरीने गावात काय घडते?

आपली शेती करायला हात कमी पडतात. पावसाळ्यापुरते खरीप पीक घ्यायचे आणि बाकीची धान्य विकत घ्यायची. लाकूड फाट्यासाठी जंगल कमी करायचे, भुजलाची पातळी खालावते, पिण्याच्या व शेतीच्या पाण्याच्या अनेक समस्या निर्माण होतात. घरची गुरे सांभाळता येत नाहीत म्हणून विकून टाकायची आणि मग शेतात रासायनिक खते घालून जमीन निकृष्ट करायची म्हणजे तिच्यावर वारेमाप खर्च करणे भागच आहे. आपल्या घरची जनावरे आपल्या लेकरांसारखी वाढलेली असतात, पण ती वाढवायला कोणी नाही म्हणून गोठे रिकामे होऊन



जातात. गावात शिल्लक राहतात फक्त म्हातारी माणसे, रिकामी घरे, शेतं आणि जंगले... म्हणजे उरते काय तर एक भकासपण...

असं आयुष्य आपण का जगायचं? शासनाचीदेखील तशी इच्छा नाहीये. शासन आपल्याला मदत करते आहे, त्याची आपण ओळख करून घ्यायला हवी.

- **महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना ही आपल्या स्थलांतराच्या अनेक प्रश्नांवर उत्तर आहे.**

  या योजनेची अंमलबजावणी योग्य प्रकारे झाली तर, आपल्याला आपल्याच गावात रोजगार मिळतो तसेच आपल्या गावातील शेती, पाणी आणि जंगल सुधारते. असे दुहेरी फायदे असणारा हा कायदा आहे!

  आपल्याला सुखी, समाधानी, समृद्ध आयुष्य जगायचं आहे ना? आपण एक सुखी आयुष्य जगायला सुरुवात करू या...


◆◆◆

२

# पार्श्वभूमी आणि प्रवास

- **महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना कशी सुरु झाली?**

महाराष्ट्रात १९७७ पासून या कायद्यासाठी प्रयत्न चालू होते. १९७७ ते २०१४ या काळात या कायद्यात पुष्कळ सुधारणा झाल्या. शेजारच्या चित्रात पाहून तुम्हाला त्याचा अंदाज येवू शकेल.



- **आता या योजनेचे आजचे स्वरूप काय आहे ते समजून घेऊ या...**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र (MGNREGS) या योजने अंतर्गत केंद्र शासन १०० दिवस प्रति कुटुंब (प्रति जॉब कार्ड) रोजगाराची हमी देते व १०० दिवस प्रति कुटुंब (प्रति जॉब कार्ड) मजुरीच्या खर्चासाठी निधी पुरवते. प्रति कुटुंब १०० दिवसावरील प्रत्येक मजुराच्या, मजुरीच्या खर्चाचा आर्थिक भार राज्य शासन उचलते. केंद्र सरकार ह्या योजनेतील प्रत्येक Job Card ला १०० दिवस रोजगाराची हमी देते, तर उर्वरित २६५ दिवसांची हमी महाराष्ट्र शासन देते.

या योजने अंतर्गत अनेक गरीब-गरजू शेतकऱ्यांना वैयक्तिक लाभाच्या व्यवस्था निर्माण होऊ शकतात. त्यात घरकुल, शेतासाठी विहीर, शेताची बांध बंदिस्ती, इ. चा समावेश आहे.

- **यात किती रुपयांच्या मजुरीची हमी दिली जाते?**

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना या योजने अंतर्गत प्रत्येकी किमान मजूरी ₹. २४८/- (२०२१-२०२२) दिली जाते.

◆◆◆

## ३

# कार्यपद्धती

- **कशी आहे या योजनेची कार्यपद्धती?**

  यामध्ये एकीकडे गरजूंची नोंदणी केली जाते. घरोघरी सर्वेक्षण करून जॉब कार्डस् बनवले जातात. त्यातून एक लेबर बजेट बनवले जाते. दुसरीकडे आपल्या गावातील कामाचे नियोजन केले जाते. गावात असलेल्या गरजांचा प्राधान्यक्रम ठरवला जातो. सर्व संसाधनांचा विचार केला जातो. कामाचे स्वरूप ठरवले जाते. काम मिळणाऱ्या माणसांची नोंद ठेवली जाते. त्यांना कामात सामावून घेणे आणि त्यांना वेतन प्रदान करणे म्हणजे मजुरी देणे ही कामे होतात. जर काम नसेल तर त्यांना बेरोजगार भत्ता दिला जातो.

- **आता लक्षात आलं का? ही योजना का महत्त्वाची आहे ते?**

### रोजगार हमी योजना

| | |
|---|---|
| मजुरांची नोंदणी | कामाचे नियोजन |
| घरोघर सर्वेक्षण | गावातील गरजांचा |
| जाँब कार्डस् | सर्व संसाधनांचा विचार |
| लेबर बजेट | कामाचा शेल्फ |

## कामाची मागणी

| काम मिळाले | काम मिळाले नाही |
|---|---|
| अंमलबजावणी | बेरोजगार भत्ता मागणी |
| मजुरी | बेरोजगार भत्ता |

**लक्षात ठेवा.**

केंद्र शासनाकडून वितरित होणारा निधी हा लेबर बजेटवर अवलंबून आहे. लेबर बजेट म्हणजे काय ते समजून घ्या.

लेबर बजेट = ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये काम करण्यास इच्छुक असलेल्या सरासरी कुटुंबाची संख्या (...) × सरासरी दिवस × मजुरी दर (जसे सरासरी ५० कुटुंबे × २० दिवस × संबंधित वर्षाचा मजूरी दर)

आता आपण आपल्या गावाचे लेबर बजेट काढू या.

गावाचे नाव :


विविध वस्त्या किंवा पाड्यांची नावे :

| अ. नु. | पाड्याचे नाव | लोकसंख्या | काम करण्यास इच्छुक व्यक्तींची संख्या | काम आवश्यकतेचे दिवस | मजुरीचा दर | पाड्याचे लेबर बजेट |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

............ गावाच्या ............ पाड्याचे ............ वर्षाचे लेबर बजेट रु. ............ /- इतके आहे.

लेबर बजेट करिता व त्याच्या अनपेक्षित वाढीसाठी कामाचा पुरेसा शेल्फ तयार असावा लागतो. ग्राम पंचायत स्तरावर विविध कामांसाठी, विविध योजनांमधून निधी येत असतो. 'रोहयो' म्हणजेच रोजगार हमी योजना ही त्यातील एक योजना आहे.

कामांचे शेल्फ तयार करत असताना रोहयो सोडून इतर योजना व त्यात समाविष्ट कामे देखील समजून घेणे गरजेचे आहे.




- **म्हणजे एक गोष्ट लक्षात आली का?**

  महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा हा मागणी आधारित कायदा आहे. यामध्ये लोकांनी मागणी केल्यानंतरच काम सुरू होतं आणि लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला जातो. म्हणूनच याबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. त्यानंतरच वरील रचनेप्रमाणे काम सुरू राहील.

  चला... योजना काय आहे, ते तर कळलं!

  आता ती राबवण्यासाठी काय काय करायचे ते पाहू या!

यात पुढील गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

**मजूर नोंदणी : ग्रामपंचायतीची मोठी जबाबदारी**

गावात कामाची आवश्यकता असणाऱ्या सर्व ग्रामस्थांच्या नोंदणी करणे, त्यांना रोजगारासाठी जॉब कार्ड मिळवून देणे हे काम ग्राम पंचायतीने करणे अपेक्षित आहे.

१) पावसाच्या दिवसांमधे ग्रामपंचायतीने गावात, किती स्त्री-पुरूषांना, कधी कामाची गरज असते याचे घरोघर जाऊन सविस्तर सर्वेक्षण करणे अपेक्षित आहे.

२) ही यादी तयार झाल्यावर ग्रामसभा बोलावून या यादीचे वाचन होणे गरजेचे आहे. या ग्रामसभेला सर्व गरजू गावकरी हजर राहतील ही जबाबदारी ग्रामपंचायतीची असते. यादीचे वाचन झाल्यावर ग्रामसभेच्या सूचनेनुसार काही बदल असल्यास ते करून ही यादी निश्चित करण्यात यावी लागते.

३) ग्रामपंचायत अध्यक्ष आणि ग्रामसेवक यांनी लोकांसमोरच त्यावर सही करून ती फाइलला लावावी.

४) उपस्थित सर्व लोकांना योजनेची इत्थंभूत माहिती या ग्रामसभेत देण्यात यावी आणि पुढील कार्यपद्धती समजावून सांगावी.

**जॉब कार्ड ही सर्वात मोठी पायरी काय आहे ते पहा.**

| | |
|---|---|
| जॉब कार्ड म्हणजे काय? | जॉब कार्ड (रोजगार पत्रक) हे मजुरांचे रोजगारासंदर्भात हक्क नोंदवणारे प्रमुख कागदपत्र / नोंदीपत्र आहे. यावर कामाच्या मागणीची आणि उपलब्ध केलेल्या रोजगाराची नोंद करण्याची सोय असल्याने आणि तशी अट असल्याने फसवणूकीची शक्यता कमी होते. |


| | |
|---|---|
| जॉब कार्ड नोंदणीसाठी कोण अर्ज करू शकेल? | १८ वर्षावरील रोजगार मिळवण्याची इच्छा असणारा कुठला ही ग्रामस्थ जॉब कार्डसाठी मागणी करू शकतो. ही नोंदणी ग्राम सेवकाकडे करता येते. |
| जॉब कार्ड नोंदणीची वेळ काय आहे? | वर्षभरात कधीही |
| घराच्या वतीने जॉब कार्डसाठी कोण अर्ज करू शकते? | कोणताही प्रौढ सदस्य घराच्या वतीने अर्ज करू शकतो. |
| जॉब कार्डची नोंदणी किती वर्षे वैध आहे? | नोंदणी पाच वर्षांसाठी वैध आहे. |
| जॉब कार्डासाठी नोंदणी करताना तपशीलांसाठी कोणताही प्री-प्रिंट केलेला फॉर्म आहे का? | जॉब कार्डसाठी फॉर्म नंबर ------ चा नमुना तयार केलेला आहे. परंतु, फॉर्मवर भर देऊ नये अशा सूचना अधिकाऱ्यांना आहेत. सोबत नोंदणी अर्जाचा नमुना जोडला आहे, परंतू कोऱ्या कागदावर योग्य कागदपत्र जोडूनही हा अर्ज करता येऊ शकतो. |
| कुटुंबातील सर्व प्रौढ सदस्य जॉब कार्डासाठी नोंदणी करू शकतात का? | होय. |
| अर्ज केला गेला तर जॉब कार्डस् जारी करण्याची वेळ मर्यादा काय आहे? | १५ दिवसांच्या आत जॉब कार्ड मिळायला हवे. |

**रोजगार हमी** - कायदा प्रती जॉब कार्ड १०० दिवसांची हमी देतो. त्यामुळे एका कार्डवर खूप सदस्य असल्यास लोकांना कमी काम मिळते. २-३ सदस्यांच्या मागे एक असे जॉब कार्ड असल्यास संपूर्ण कुटुंबाला योग्य प्रमाणात काम उपलब्ध होऊ शकते.

१०० दिवस रोजगाराची हमी ही प्रति कुटुंब म्हणजेच प्रति जॉब कार्ड आहे. त्यामुळे कुटुंब वेगळे झाले तर नवीन जॉब कार्ड काढून घ्यावे. त्यासाठी खालील फॉर्म भरून तहसीलदार कार्यालयात जमा करायला हवा.

**ब) कामाचे नियोजन :**

मजूर नोंदणी प्रमाणेच कामं काढणे हा एक महत्त्वाचा भाग आहे. या कामांची गावाच्या दृष्टीने उपयुक्तता लक्षात घेण्याबरोबरच,'मागेल त्याला, मागेल तेव्हा काम' उपलब्ध करून देण्यासाठी या कामांचे नियोजन होणे अत्यंत आवश्यक आहे, त्याचबरोबर कामं निवडताना उपलब्ध असलेल्या स्थानिक नैसर्गिक संसाधनांचा ही विचार केला जावा. म्हणूनच NRLM सारख्या योजनांशी सांगड घालून आराखडा ठरवावा लागतो.




एकात्मिक विकासाच्या दृष्टीने
कामाचा वार्षिक आराखडा


**गावाच्या विकासाच्या दृष्टीने गावात कोणकोणती कामे करता येतात, ज्यात मजुरांना काम मिळेल अशी व्यवस्था केलेली आहे ?**

- शेत तळी खोदणे
- गाव तळी
- बंधारे बांधणे
- समतल चर खणणे
- रस्ते बांधणे
- वनतळी
- पाणलोट
- दगड माती बांध बांधणे
- ८०% पाणलोटाची कामे
- वृक्ष लागवड
- शेताची बांधबंदिस्ती करणे

### वैयक्तिक लाभाच्या योजना

- विहीर
- सपाटीकरण
- घरकुल
- फळबाग फुलवणे
- शेततळे
- गोठा

ग्रामसभेने सुचवलेली कामे कुठे, कधी करता येतील तसेच त्यासाठी किती मजूर, पैसा, माल आणि मशिनरी लागेल हे ग्रामपंचायतीने ठरवायचे आहे. या सर्वांचा अंदाज ज्या कागदावर लिहिलेला असतो तो कागद म्हणजे गावाचा नियोजन आराखडा.




**क) या नियोजन आराखड्याचा प्रवास कसा होतो ? :**

तालुका स्तरावर कामांची विभागणी होणे, विविध विभागांकडून कामांचे अंदाजपत्रक तयार होणे व कामांना मान्यता मिळून गावाचे शेल्फ तयार होणे ही सर्व कामे केली जातात. गावाने सुचवलेल्या कामांमध्ये अधिकाऱ्यांना वाढ

करता येऊ शकते. मात्र गावाने सुचवलेली कामे आराखड्यामधून गाळता येऊ शकत नाहीत.

**या प्रक्रियेतील विविध पायऱ्यांचे वेळापत्रक :**

रोजगार हमी कायदा मागेल त्याला / तिला, मागेल तेव्हा मागेल तितके काम मिळण्याची हमी देते. कामे नियोजन बद्ध होण्यासाठी खालील वेळापत्रकाप्रमाणे नियोजन करता येऊ शकते.

| तारीख | अपेक्षित कारवाई |
|---|---|
| १५ ऑगस्ट | ग्रामसभेची वार्षिक आराखड्याला मंजुरी आणि कार्यक्रम अधिकाऱ्यांकडे पाठवणे |
| १५ सप्टेंबर | ग्रामपंचायतींच्या आराखड्यांचे एकत्रीकरण आणि कार्यक्रम अधिकाऱ्यांद्वारे पंचायत समितीपुढे सादरीकरण |
| २ ऑक्टोबर | पंचायत समितीची, तालुका वार्षिक आराखड्याला मान्यता |
| १५ नोव्हेंबर | जिल्हा वार्षिक आराखड्याचे, जिल्हा कार्यक्रम समन्वयकांद्वारे जिल्हा परिषदेमध्ये सादरीकरण |
| १ डिसेंबर | जिल्हा परिषदेची जिल्हा वार्षिक आराखड्याला मान्यता |
| १५ डिसेंबर | प्रत्येक ग्रामपंचायतीचे शेल्फ तयार असल्याची जिल्हा कार्यक्रम समन्वयकांद्वारे खातरजमा |
| ३१ डिसेंबर | राज्याचे लेबर बजेट केंद्रशासनाच्या मंजुरीसाठी सादर |

### ड) कामाची मागणी कशी करायची?

एकदा आपल्याकडे जॉब कार्ड आले की, आपण या योजनेच्या अंतर्गत कामासाठी अर्ज करण्यास पात्र आहात. नमुना क्रमांक ४ भरून कामाची मागणी करता येते. हा अर्ज नसल्यास साध्या कागदावरही मागणी केली जाऊ शकते. हा अर्ज भरल्याची **पोचपावती** म्हणजे नमुना क्रमांक ५ ही पोचपावती देणे **हे ग्रामसेवकाचे किंवा ग्राम रोजगार सेवकाचे काम आहे.**

ग्रामसेवक/रोजगार सेवकाने फॉर्म ४ ची पोच देण्यास नकार दिल्यास किंवा काम मागणी जमा करून घेण्यास नकार दिल्यास काय करावे? फॉर्म ४ तहसील कार्यालयात देखील जमा करता येऊ शकतो. तिकडे देखील त्याची पोच मिळते. फॉर्म ५ मिळाला नाही तरी आवक-जावक मधून फॉर्म ४ ची पोच घ्यावी.

एकदा आपण कामासाठी अर्ज केला की, आपण ज्या दिवशी काम मागितले त्या तारखेस आपल्याला पावती मिळते. कामाच्या मागणीपासून १५ दिवसांच्या आत काम मिळणे बंधन कारक आहे.

आपण वैयक्तिकरित्या किंवा गटात काम करण्यासाठी अर्ज करू शकता. तथापि, किमान १४ दिवस काम करणे अनिवार्य आहे.

### ई) काम न मिळाल्यास काय करायचे?

१५ दिवसांच्या आत काम न मिळाल्यास अर्जदार बेरोजगार भत्ता मिळण्यास पात्र ठरतो.

कायद्याच्या कलम ७ नुसार बेरोजगार भत्त्याचे वाटप केले जाते. लक्षात घ्या, भत्त्याची रक्कम पहिल्या ३० दिवसांकरता किमान मजुरीच्या २५% पेक्षा कमी नसेल, तर त्या आर्थिक वर्षासाठी उर्वरित काळासाठी ती ५०% पेक्षा कमी नसेल.

**फ) काम मिळाल्यानंतर लक्षात घ्यायच्या गोष्टी 'वर्क ऑर्डर' (नमुना क्र. ७) महत्वाची आहे :**



आपल्याला काम मिळालेले आहे याचं पत्र म्हणजे वर्क ऑर्डर! ती नीट तपासून घेणे गरजेचे आहे. **कोणते व किती काम, कोणत्या ठिकाणी, कोण राबवणार** आहे यासारख्या बाबी नीट तपासून घेणे आवश्यक आहे.

- **कामाच्या ठिकाणी ही महत्त्वाची पायरी आहे.**



प्रत्येक काम सुरू करण्यापूर्वी अशा मजूर बैठकीचा आग्रह धरावा व सर्व बाबी समजून घ्याव्यात. किती आणि कसं काम केलं तर कशी मजूरी सुटेल हे समजून घेणं आवश्यक आहे.

- **कामावरच्या सोयी सवलती पण लक्षात घ्या.**



१) गावापासून ५ कि. मी. पेक्षा जास्त अंतरावर रोजगार दिल्यास १० टक्के जास्त मजुरी.

२) कामावर पिण्याचे पाणी, प्राथमिक उपचार व बरोबर आणलेल्या ६ वर्षाखालील लहान मुलांना सांभाळण्याची सोय.

३) कामाच्या अनुषंगाने मजुरास वा बरोबर आणलेल्या लहान मुलास दुखापत झाल्यास रुग्णास सर्व रुग्णसेवा शासकीय खर्चाने व दैनिक मजुरीच्या ५० टक्केपर्यंत रक्कम सानुग्रह रुग्ण भत्ता. अपंगत्व वा मृत्यू आल्यास ₹. ५०,०००/- पर्यंत सानुग्रह अनुदान.

- **कामाचं मोजमाप कसे करतात आणि मजूरी कशी मिळते ?**

दर पंधरा दिवसांनी कामाचे मोजमाप आणि मजुरीचा हिशोब होणे बंधनकारक आहे, त्याबरोबरच पुढील २ दिवसात मजुरी वाटप करणेही. कुठल्याही कारणासाठी मजुरी वाटप लांबणीवर जाऊ नये असं कायदा सांगतो.

◆◆◆


४

# तक्रार निवारण यंत्रणा

- **ही सगळी योजना राबवताना काही गडबड झाली तर तक्रार निवारण यंत्रणा पण असते!**

  या योजनेत म्हटल्याप्रमाणे गोष्टी न घडल्यास काय करावे, यासाठी ही यंत्रणा लावण्यात आली आहे. असे झाल्यास आपल्याला आपली तक्रार नोंदवता येईल. अशा तक्रारी नोंदवण्यासाठी तक्रार पेटी खालील ठिकाणी सर्वांना सहज दिसेल अशा ठिकाणी ठेवली आहे का, हे आपण पाहणे गरजेचे आहे.

- **तक्रार कोठे नोंदवणार?**



तुमच्या तक्रारींची दखल ७ दिवसात घेतली जायला हवी, असे कायदा सांगतो. भ्रष्टाचार उघडकीस आला तर सबंधित अधिकाऱ्यास ₹. १,000/- दंड भरावा लागेल असेही नवीन कायद्यात नमूद आहे.

◆◆◆

# ५

# काही महत्त्वाच्या व्यक्ती

या योजनेत काही व्यक्तींचे महत्त्वपूर्ण काम असते.

**रोजगार सेवक :**

ग्राम सेवकाला मदत व्हावी यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी एका ग्राम रोजगार सेवकाची नेमणूक करता येते. ही नेमणूक ग्रामसभा घेऊन करण्यात येते. ग्राम रोजगार सेवकाचे शिक्षण किमान आठवी ते दहावी झालेले असावे.

**त्याची कामे :**

१) मजूर-नोंदणी, मागणीचे अर्ज, जॉब कार्डवरची वेगवेगळी माहिती, हजेरीपत्रक अशा गोष्टी भरण्यात ग्राम रोजगार सेवकाने ग्राम सेवकाला मदत करावयाची आहे.

२) मजूरांना सोयी नीट पुरवल्या जात आहेत ना ते पाहणे.

३) कामाचे मोजमाप, मजुरीचा हिशोब कसा झाला हे मजूरांना समजावून सांगणे.

४) मस्टरच्या रकमेच्या पाऊण टक्के रक्कम ग्राम रोजगार सेवकाला पगार म्हणून मिळणे अपेक्षित आहे.

**तांत्रिक अधिकारी :**

ग्रामपंचायतीने सुचवलेल्या कामाचा आराखडा करण्यास मदत व्हावी म्हणून प्रत्येक १० ग्रामपंचायतीमागे एका तांत्रिक अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येते. ही नेमणूक २ प्रकारे करता येते. सरकारच्या वेगवेगळ्या खात्यांचे इंजिनियर्स

जिल्हा परिषदेला नेमता येतात किंवा एखाद्या सामाजिक संस्थेचे इंजिनियरिंगची पदवी किंवा डिप्लोमा असलेले कार्यकर्ते देखील तांत्रिक अधिकारी म्हणून नेमले जाऊ शकतात.

**त्याची नेमून दिलेली कामे :**

१) ग्राम पंचायतीने सुचवलेल्या कामांचा तांत्रिक आराखडा करून देणे हे तांत्रिक अधिकाऱ्याचे प्रमुख काम आहे.

२) कामांचा तांत्रिक दर्जा योग्य आहे ना हे पाहणे.

३) तांत्रिक बाबतीत कामाच्या ठिकाणी काही अडचण आल्यास ती सोडवणे.

४) मोजमापाबद्धलची सर्व शहानिशा करणे.

५) मस्टर बंद करताना मजुरांना कामाचा आणि मजुरीचा हिशोब समजावून सांगणे.

◆◆◆

# ६

# ऑनलाइन डेटा


**वेबसाइट(संकेतस्थळ) :**
आता तर आपण इंटरनेट वर पण या योजनेची संपूर्ण माहिती सहज बघू शकतो.

https://nrega.nic.in/netnrega/HomeGP.aspx






Report या tab वर गेल्यावर हवं ते राज्य निवडून विविध प्रकारचा Data पाहता येतो.



# ७

# महत्त्वाची कागदपत्रे

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**नमुना क्रमांक ३ - रोजगार पत्रक**

ग्रामपंचायत संकेतांक :

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

(राज्य संकेतांक/जिल्हा संकेतांक/गट संकेतांक/ग्रामपंचायत संकेतांक)

कुटुंब नोंदणी पत्रक क्रमांक :

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

(वर्ष व नोंदणी क्रमांक)

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत

रोजगार मागणाऱ्या कुटुंबासाठी फोटोसहित ओळखपत्र-आणि रोजगार पत्रक

(सन २००५ - २००६ ते २००९ - २०१०)

(पाच वर्षांकरिता वैध)

**टीप :**

१) ग्रामपंचायत संकेतांक हा दारिद्र्य रेषेच्या सर्वेक्षणातील संकेतांकाप्रमाणे असावा.

२) कुटुंब नोंदणी रोजगार पत्रक क्रमांकामध्ये प्रथम दोन चौकटीत वित्तीय वर्ष दर्शवावे.
उदा. ०५-०६ व पुढील पाच चौकटीमध्ये अनुक्रमांक दर्शवावा. उदा. ००००१.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# कुटुंब ओळखपत्र

१) ग्रामपंचायत संकेतांक : ..........................................................................................

(राज्य संकेतांक/जिल्हा संकेतांक/गट संकेतांक/ग्रामपंचायत संकेतांक)

कुटुंब नोंदणी पत्र क्रमांक : ..........................................................................................

(वर्ष व नोंदणी क्रमांक)

२) कुटुंब प्रमुखाचे नाव : ..........................................................................................

३) अजा/अज/इं. आ. यो. लाभार्थी/भुसुधार लाभार्थी : ..........................................................

असल्यास ✓ अशी खूण करावी.

४) काम करण्यास पात्र व इच्छुक असलेल्या कुटुंबातील अर्जदाराच्या नावासह व्यक्तींची नावे :

| अ. क्र. | कुटुंबातील प्रौढ व्यक्तींची नावे | वडिलांचे/ पतीचे नाव | स्त्री/ पुरुष | नोंदणीच्या तारखेस वय | मतदार यादीतील भाग क्रमांक व अनुक्रमांक | सही/ अंगठा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

५) अर्जदाराचा पत्ता :

गाव : ग्रामपंचायत : तालुका : जिल्हा :

६) कुटुंबाचा नोंदणी क्रमांक :

७) सरपंच आणि ग्रामसेवक यांनी साक्षांकित केलेला कुटुंबातील रोजगार मागणाऱ्या प्रौढ व्यक्तींचा एकत्रित फोटो.

कुटुंब प्रमुखाची सही/निशाणी/अंगठा

नोंदणी करणाऱ्या प्राधिकाऱ्याची
स्वाक्षरी व शिक्का

## नमुना क्र. ३ अ
## रोजगार अभिलेख

१) कुटुंबाचा नोंदणी पत्रक क्रमांक : | | | | | | | | |

२) रोजगार मागणीबाबत अभिलेख :

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | रोजगार मागणीसाठी अर्ज सादर केल्याचा दिनांक | कोणत्या कालावधीसाठी रोजगार पाहिजे आहे | | एकूण दिवस |
|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

टीप : नमुना क्रमांक ४ मधील मागणी अर्जानुसार माहिती भरावी.

बाब २१४६

## नमुना क्र. ३ ब

१) कुटुंबाचा नोंदणी पत्रक क्रमांक : | | | | | | | | |

२) रोजगार मागणीबाबत अभिलेख :

| अ. क्र. | महिना व वर्ष | रोजगार दिलेल्या कुटुंबातील व्यक्तीचे नाव | रोजगार दिलेला कालावधी | | | | कामाचे नाव व ठिकाण | हजेरी पटाचा क्रमांक | प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | दिवस | पडलेली मजुरी (रु.) | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

**टिप** : १) कोणताही रकाना रिकामा ठेवू नये.
२) दर महिन्याअखेर पुरविण्यात आलेल्या एकूण रोजगाराच्या दिवसांची बेरीज करण्यात यावी.
३) अशा कुटुंबातील प्रत्येक सदस्याची माहिती स्वतंत्रपणे लिहावी.
४) अशा प्रकारे कुटुंबासाठी एकत्रित १०० दिवसांचा रोजगार पूर्ण झाल्यावर तशी नोंद लाल शाईने पुढील ओळीत करावी.
५) मागील महिन्याची बेरीज लिहिल्यावर, त्याच पानावर पुढील ओळीत लगेच पुढील महिन्याच्या नोंदी कराव्यात.
६) ५ वर्षांकरिता रोजगार पुरविण्यात येणाऱ्या सर्व नोंदी याच अभिलेखावर कराव्यात.

## नमुना क्र. ४
## (नियम ६ पहा)
## रोजगार हमी योजनेखाली रोजगार मागणीचे पत्र

प्रति,

समिती अधिकारी

तालुका : ____________________

नोंदणी प्राधिकारी,

गाव : तालुका :

महोदय,

रोजगार हमी योजनेखाली मला रोजगार पुरविण्याची मी आपणास विनंती करतो. माझ्यासंबंधीचा तपशील पुढीलप्रमाणे -

१) नाव : ____________________

२) पुरुष/स्त्री : ____________________

३) नोंदणी क्रमांक : ____________________

४) पत्ता : ____________________

मी याद्वारे हमी देतो की, समिती अधिकाऱ्याने निर्देशित केलेल्या कामावर मी किमान ३० दिवस काम करीन.

ठिकाण : ____________________

दिनांक : ____________________

आपला विश्वासू,

अर्जदाराची सही किंवा निशाणी अंगठा

## नमुना क्र. ५
## (नियम ६ पहा)
## रोजगार हमी योजनेखाली रोजगार केलेल्या अर्जाची पोच

श्री./श्रीमती/कुमारी : ______________________

राहणार : ______________________

पंचायत समिती : ____________ यांचा दिनांक : ____________ चा रोजगार हमी योजनेखाली रोजगार मिळण्याबाबतचा अर्ज मिळाला. सदर योजनेखाली रोजगार मिळण्यासाठी त्यांच्या नावाची नोंद : ____________ गावामध्ये झाली आहे. त्यांचा नोंदणी क्रमांक : ____________ आणि नोंदणीचा दिनांक : ____________ आहे.

ठिकाण : ____________

दिनांक : ____________

अर्ज स्वीकारणाऱ्या अधिकाऱ्याची

सही व पदनाम

## नमुना क्र. ७
## (नियम ७ पहा)
## रोजगार हमी योजनेखाली मंजूर केलेल्या कामावर रोजगार मागणाऱ्यास पाठविण्याबाबतचे पत्र

प्रति,

श्री./श्रीमती/कुमारी : ____________________

नोंदणी क्रमांक : ____________________

गाव : ____________________

पंचायत समिती : ____________________

**संदर्भ : रोजगार हमी योजनेखाली रोजगारासाठी केलेला आपला दिनांक : ____________ चा अर्ज**

कृपया हे पत्र मिळाल्यापासून ७ दिवसांच्या आत खाली नमूद केलेल्या कामाच्या ठिकाणी अंमलबजावणी अधिकाऱ्यास (किंवा त्याच्या प्रतिनिधीस) रोजगारासाठी भेटावे.

ठिकाण : ____________

दिनांक : ____________

समिती अधिकाऱ्याची सही

---

**सूचना : उपरोक्त कामाच्या पंचायत समिती स्तरावरील अंमलबजावणी अधिकाऱ्यास या पत्राची प्रत शेरा लिहून पाठवावी.**

आपले शासन आपल्याला मदत करू इच्छिते.
आपण या गोष्टी समजून घेऊन जर शासनाला साथ दिली तर आपल्याला रोजगार मिळेलच पण त्या बरोबरीने आपल्या गावाचा, पंचक्रोशीचा विकास होईल.
आपला विकास कोण घडवेल?
फक्त आपणच...
आपला विकास फक्त आपल्याच हातात आहे.
आपल्या गावात आपल्या कुटुंबासमवेत आनंदाने राहण्यासाठी आजच नरेगा योजनेत सहभागी व्हा!
आत्मनिर्भर बना...!

रीड्स ही एक विश्वस्त संस्था आहे. गेल्या ३० वर्षांपासून पाणी संवर्धन-संरक्षण, उपजीविका, शेती- सुधारणा, बचतगट, पाणलोट क्षेत्र-विकास या विषयात ती विविध राज्यात कार्यरत आहे. गेल्या ५ वर्षांपासून मध्य भारतातील जनजाती क्षेत्रांमध्ये संस्थेने आपले कार्य विस्तारले आहे.

रीड्स ही सामाजिक संस्था जनजाती भागात आर्थिक सक्षमीकरणाचे काम करते. जल, जमीन, जंगल, पशु आणि जन हे ह्या संस्थेच्या केंद्रस्थानी आहेत. नैसर्गिक स्रोतांचे संरक्षण आणि संवर्धन ही अत्यंत जबाबदारीची भावना जनजाती भागात रुजवणे, स्थानिक संसाधनांचा नियोजनबद्ध उपभोग, त्यांचे बळकटीकरण आणि परिसराचा शाश्वत विकास ही रीड्सची कार्यपद्धती आहे.

स्थानिक संस्था आणि जनजाती समाज यांचे शाश्वत विकास या विषयात सक्षमीकरण, प्रकल्प लेखन व अहवाल लेखनात सहाय्य आणि प्रकल्प अंमलबजावणीसाठी तांत्रिक मार्गदर्शन असे सर्व सहाय्य रीड्स मार्फत स्थानिक संस्थेला पुरवण्यात येते.

R E E D S

Research in Environment, Education and Development Society

**आपले शासन आपल्याला मदत करू इच्छिते.**

आपण या गोष्टी समजून घेऊन जर शासनाला साथ दिली तर आपल्याला रोजगार मिळेलच पण त्या बरोबरीने आपल्या गावाचा, पंचक्रोशीचा विकास होईल. आपला विकास कोण घडवेल?

फक्त आपणच...

आपला विकास फक्त आपल्याच हातात आहे.

आपल्या गावात आपल्या कुटुंबासमवेत आनंदाने राहण्यासाठी आजच नरेगा योजनेत सहभागी व्हा! आत्मनिर्भर बना...!

REEDS

Research in Environment, Education and Development Society